महाराष्ट्र शासन

Email id - ravindra.sawant84@nic.in
फोन नं.०२२-२२०२६४८८

क्र.:-एलक्यूएन-०२/२०१७/प्र.क्र.१२/अ-२
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दि.२७ फेब्रुवारी, २०१७.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

विषय : सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

संदर्भ .१ : शासन परिपत्रक, समक्रमांक, दि.२५.०१.२०१७.

महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर हाती घेतले असून त्यांच्यासाठी ५ते १० टक्के प्रमाणात भूसंपादनाची आवश्यकता आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे पत्र क्र .NH-११०११/३०(१)/२०१६-LA ,दि.२६.९.२०१६ अन्वये राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र राज्याच्या धोरणानुसार थेट पध्दतीने जमीन खरेदीस परवानगी दिली आहे.

२. शासन परिपत्रक, समक्रमांक, दिनांक २५ जानेवारी, २०१७ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. परिपत्रकातील मुद्दा क्र.८(क) मध्ये *"संबंधित भूधारकांकडून क्षतिपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) घेतल्यानंतर, संबंधित प्रादेशिक विभागाच्या/ प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी देय रक्कम संबंधित भूधारकांच्या बँक खात्यामध्ये जमा करावी."* असे नमूद केले आहे. तथापि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या दि. २७ मे, २०१६ च्या परिपत्रकामधील तरतुदी विचारात घेता, राष्ट्रीय महामार्गासाठी थेट खरेदी पद्धतीने जमीन ताब्यात घेण्यासाठी दि.२५.०१.२०१७ च्या परिच्छेदातील मुद्दा क्र. ८(क) मधील तरतूदीऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. सक्षम प्राधिकारी (CALA) व राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे भारतीय स्टेट बँकेमध्ये संयुक्त खाते उघडण्यात यावे.
२. राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे प्रकल्प सल्लागाराने सादर केलेले थेट खरेदीने घ्यावयाच्या जमिनीचे क्षेत्र व त्या जमिनीचे खाजगी, वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने परिगणित केलेली ढोबळ किंमत या बाबतचा अंदाज सक्षम अधिकारी (CALA) यांना पाठविण्यात येईल. त्याआधारे सक्षम अधिकारी (CALA) हे राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याकडे थेट खरेदीसाठी अंतरीम निधीची मागणी नोंदवितील. सदरील अंतरीम मागणीच्या आधारे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गाचे सक्षम प्राधिकारी हे राष्ट्रीय महामार्गासाठीचे सक्षम प्राधिकारी (CALA) व राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे भारतीय स्टेट बँकेमध्ये असलेल्या

Scanned by CamScanner

संयुक्त खात्यामधे Electronic Clearance System/RTGS आवश्यक तो निधी हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करतील.

३. प्रत्यक्ष संयुक्त मोजणी झाल्यानंतर संबंधित भूधारकाकडून क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) घेतल्यानंतर सक्षम प्राधिकारी (CALA) व राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे भारतीय स्टेट बँकेमध्ये असलेल्या संयुक्त खात्यातून देय रक्कम संबंधित भूधारकाच्या बँक खात्यात Electronic Clearance System/RTGS पध्दतीने जमा करण्यात येईल. प्रत्यक्ष मोजणीनंतर थेट खरेदीच्या अंतरिम अंदाजामध्ये वाढ झाल्यास सक्षम अधिकारी (CALA) हे राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे थेट खरेदीसाठीच्या अतिरिक्त निधीची मागणी नोंदवितील. सदरील अंतरिम मागणीच्या आधारे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गाचे सक्षम अधिकारी हे राष्ट्रीय महामार्गासाठीचे सक्षम प्राधिकारी (CALA) व राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे भारतीय स्टेट बँकेमध्ये असलेल्या संयुक्त खात्यामधे Electronic Clearance System/RTGS आवश्यक अतिरिक्त निधी हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करतील.

तरी महाराष्ट्रामध्ये सन २०१६-१७ मध्ये हाती घेतलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्पांसाठी थेट वाटाघाटीने जमीन ताब्यात घेण्याबाबत वरीलप्रमाणे कार्यवाहीच्या सूचना आपल्या अधिनस्त सर्व सक्षम प्राधिकारी (CALA) यांना देण्यात याव्यात.

तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने सन २०१६-१७ मध्ये महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गाच्या मंजूर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी सल्लागारांनी केलेल्या प्रकल्प अहवालानुसार ढोबळमानाने रु. १५४८.७४ कोटी रकमेची आवश्यकता असून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने सन २०१६-१७ मध्ये भूसंपादनासाठी रु. १००० कोटी रकमेची तरतूद केली आहे. दि.३१ मार्च २०१७ पूर्वी सदरील तरतूद वापरावयाची असल्याने सन २०१६-१७ मध्ये मंजूर असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनासाठी 'सक्षम प्राधिकारी(CALA)' नेमण्याची कार्यवाही ८ दिवसात पूर्ण करावी .

तसेच सर्व सक्षम प्राधिकारी(CALA) यांना राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागाच्या / प्राधिकरणाच्या/ महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी यांचेकडून खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने परिगणित केलेली ढोबळ किंमत याबाबतचा अंदाज प्राप्त झाल्यानंतर फेब्रुवारी २०१७ च्या अखेरपर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याकडे अंतरीम निधीची मागणी नोंदविण्याच्या आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

शासन परिपत्रक, समक्रमांक, दि.२५.१.२०१७ मधील परि.क्र.८(क) मध्ये वरीलप्रमाणे केलेल्या सुधारणा ह्या फक्त राष्ट्रीय महामार्गाच्या कामकाजासाठीच लागू राहतील. अन्य प्रकरणाबाबत वरील सुधारणा लागू राहणार नाहीत.

(सु.कि.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

सचिव (बांधकामे) , सा.बां विभाग , मंत्रालय ,मुंबई३२-

मुख्य अभियंता,(रा.म.), कोकण भवन, बेलापूर,नवी मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner